


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १४८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# आज माझ्यासोबत माझा भाऊ राज...

## नाशिकच्या सभेत उद्धव ठाकरेंनी भावाचंही केलं कौतुक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, नाशिक :** दोन भाऊ एकत्र आल्यामुळे नाशिकचा कायापालट होऊ शकतो असा विश्वास व्यक्त करत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी नाशिक महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा शंखनाद केला. या संयुक्त सभेने नाशिकच्या राजकीय वातावरणात मोठी खळबळ उडवून दिली असून, दोन्ही नेत्यांनी भाजपच्या कार्यपद्धतीवर विखारी टीका केली.



**'दोन भावांच्या एकत्र येण्याने नाशिकचा कायापालट'**

सभेच्या सुरुवातीलाच उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्यासोबत व्यासपीठ शेअर केल्याबद्दल आनंद व्यक्त केला. आज मला खूप आनंद होत आहे कारण माझा भाऊ राज माझ्यासोबत आहे. जेव्हा आम्ही एकत्र नव्हतो, तेव्हा 'एकत्र का येत नाही?' असे विचारले जायचे आणि आता आलो आहोत, तर 'का आलात?' असे विचारले जाते.

आमच्या एकत्र येण्याची कोणीही चिंता करू नका, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना सुनावले. राज ठाकरे यांनी नाशिक मनपाच्या सत्तेत असताना केलेल्या कामांचे कौतुक करत, मुंबई आणि नाशिकचा विकास अनुभव असलेल्या दोन शक्ती एकत्र आल्याने नाशिकचा चेहरा बदलेल, असा दावा त्यांनी केला.

**तपोवन वृक्षतोडीवरून निशाणा**

नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोडीचा मुद्दा उद्धव ठाकरे यांनी अत्यंत आक्रमकपणे मांडला. भाजपवर टीका करताना ते म्हणाले, भाजपाचे हिंदुत्व हे केवळ 'चुनावी हिंदुत्व' आहे. एकीकडे राम मंदिराचा डंका पिटता आणि दुसरीकडे प्रभू रामचंद्र जिथे तपस्येला बसले होते, त्या तपोवनातील झाडे कापण्याचा उद्योग करता.

उद्या प्रभू रामचंद्र कुठे तपस्येला बसले होते असे विचारले, तर काय इथले 'नमो भवन' दाखवणार का? भाजप धर्माची पट्टी लावून लोकांना अंधभक्त बनवत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**'भाजपा हा उपटसुभांचा आणि कुत्ता-बिल्लींचा पक्ष'**

माजी नेते सुधाकर बडगुजर आणि दिनकर पाटील यांच्या भाजप प्रवेशावर उद्धव ठाकरेंनी जोरदार फटकेबाजी केली. भाजपा आता उपटसुभांचा पक्ष झाला आहे. कालपर्यंत ज्यांच्यावर तुम्ही गंभीर आरोप केले, 'सलीम कुत्ता'चे साथीदार म्हटले, त्यांनाच आता पक्षात घेताय? पक्ष वाढवण्यासाठी तुम्हाला कुत्ता, बिल्ली सर्व चालते, असा टोला त्यांनी लगावला.

# टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांकडून 'दैनिक अक्षराज दिनदर्शिकेचे' जोरदार स्वागत



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** जिल्ह्यासह पारनेर तालुक्यात दैनिक अक्षराज दिनदर्शिकेची सर्वाधिक मागणी होत असून टाकळी ढोकेश्वर व परिसरात तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये घरोघरी त्याचबरोबर व्यवसायाच्या ठिकाणी, महत्त्वाचे कार्यालय या ठिकाणी दैनिक अक्षराजची दिनदर्शिका गेली असून टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी वर्षभराचे सण, उत्सव,तिथी आदींसह इत्यंभूत माहितीचा खजाना असणाऱ्या दैनिक अक्षराज दिनदर्शिकेचे आदर्श गाव टाकळी ढोकेश्वर येथे आज शनिवारी सकाळी बसस्टँड मुख्य चौकात प्रकाशन करून जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी टाकळी ढोकेश्वर गावचे सरपंच तथा खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, आदर्श गाव योजनेचे महेश पाटील, विकास सोनुळे, विलास नाईकवाडी,रंजन निवडुंगे, बाळासाहेब झावरे, प्रकाश गायकवाड,निवडुंगे, थोपटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दैनिक अक्षराज मिडियाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला न्याय !**

▶दैनिक अक्षराज मिडिया ने सर्वसामान्य जनतेला न्याय देताना जिल्ह्यातील जनतेच्या मनात आदरयुक्त दबदबा निर्माण केला आहे. सर्वसामान्य जनतेला खऱ्या अर्थाने आधार देण्याचे काम दैनिक अक्षराजने केले आहे. जनतेचे व्यासपीठ म्हणून गेली पाच वर्षे वृत्तपत्र म्हणून काम करताना राजकारणातील दिग्गजांची पर्वा न करता सत्य लिखाण प्रसिद्ध करून ढोंगी राजकारण्यांचा बुरखा पाडण्याचे काम केले आहे. एक परिपूर्ण दिनदर्शिका देऊन त्यांनी धार्मिक संस्कृतीला चालना देण्यासाठीचा त्यांचा प्रयत्न आहे.

**-- बाळासाहेब खिलारी,**
**अध्यक्ष, खासदार निलेश लंके प्रतिष्ठान**

**दैनिक अक्षराजचे शेतकऱ्यांना पाठबळ !**

▶दैनिक अक्षराज मिडियाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाठबळ देण्याचे काम होत असून आज शेतकरी अडचणीत सापडला असून केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची गरज आहे. यासाठी दैनिक अक्षराजने वेळोवेळी आवाज उठवला असून दैनिक अक्षराज दिनदर्शिका माहितीपूर्ण आहे.

**-- महेश पाटील**

# जामठी ते सावळदबारा तसेच रस्ते विकासासाठी ११ कोटी तर पायाभूत सुविधांच्या कामासाठी ४ कोटी

## आ.अब्दुल सत्तार यांच्याहस्ते विविध विकास कामांचा भूमिपूजन थाटात

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.०९, सोयगाव :** माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने जामठी ते सावळदबारा तसेच घाणेगाव -जयदेववाडी देऊळगाव (गुजरी) रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण , काँक्रीटीकरणं व डांबरीकरण या कामासाठी जवळपास ११ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला. या कामासह जवळपास ४ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाला.

सोयगाव तालुक्यातील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पिंपळा, जामठी, ठाणा, फर्दापूर तांडा, फर्दापूर, डाभा, घाणेगाव, चारुतांडा, मोलखेडा, देव्हारी, टिटवी या गावांमध्ये पायाभूत मूलभूत विकास कामांसाठी मंजूर जवळपास ३ कोटी ७० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.या कामांमध्ये रस्ते विकास, विविध विकास कामांचे बांधकाम, सभामंडप तसेच इतर नागरी सुविधा विकासकामांचा समावेश आहे.

मतदारसंघातील नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देऊन विकासकामे राबवली जात आहे. भूमिपूजन करण्यात आलेल्या कामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी दिली. गुणवत्तापूर्ण आणि निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्यावर अधिकाऱ्यांनी भर द्यावा अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



**जामठी ते सावळदबारा तसेच घाणेगाव -जयदेववाडी देऊळगाव (गुजरी) रस्ता होणार गुळगुळीत**

उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र शासनाने सोयगाव तालुक्यातील जामठी - पळसखेडा- टिटवी - सावळदबारा या रस्त्याच्या कामासाठी ८ कोटी ५० लाख तर घाणेगाव - जयदेववाडी सावळदबारा - देऊळगाव (गुजरी) या रस्त्यासाठी २ कोटी ७ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. या कामाचे भूमिपूजन आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले. भूमिपूजन करण्यात आलेल्या रस्त्यामुळे नागरिकांची दैनंदिन ये-जा सुलभ होणार असून विकासाला चालना मिळणार आहे.

विविध गावात संपन्न झालेल्या विकास कामांच्या भूमिपूजन प्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे, शिवसेना तालुकाप्रमुख धरम सिंग चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक दारासिंग चव्हाण, माजी सरपंच शिवाप्पा चोपडे, माजी सरपंच लूखमान सेठ, मदन राठोड, महेश राठोड, मुकेश चव्हाण, राधेश्याम जाधव, सांडू तडवी, सरपंच ज्ञानेश्वर वारंगणे, गुलाब राणा, स्वानंद पाटील, अतुल पाटील, इरफान भाई, रमेश इंगळे, सुरेश चव्हाणा, हिरा जाधव, राहुल हेल्लोडे, ईश्वर शेळके, रामेश्वर सुरडकर, विठ्ठल दांडगे, दुर्गादास दांडगे, संजय जाधव, बालू डोखळे, उत्तम जाधव, भास्कर जाधव, अंकुश सुरोशे, दिलीप पाटील, मोहम्मद आरिफ, सरपंच मोहन सुरडकर, गणेश खैरे, अनिल पाटील, फिरोज खान, मुनाफ भाई, किसन सूर्यवंशी, राजू तडवी, अमजद तडवी, पंजाबराव देशमुख, वसंत चोरमले, भागवत जाधव, सरपंच करतार चव्हाण, गुलाब राठोड, गोपाल चव्हाण, आकाश जाधव, मेघराज जाधव, सतीश सावंत, गंगाधर सदाशिवे, कैलास मुळे, चंद्रकांत जाधव, नितीन शेळके, आळेकर सर, संतोष आळेकर, भास्कर सोनवणे इत्यादी सर्व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# पेरियार विद्यापिठाच्या कुलपतींकडून ऐरोलीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारकाची प्रशंसा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, नवी मुंबई :** महानगरपालिकेचे ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारक हे बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचारांना व्यापक अवकाश उपलब्ध करुन देणारे स्मारक म्हणून देशा-परदेशातील नामवंतांकडून तसेच नागरिकांकडून नावाजले जात आहे. स्मारकाला दररोज मोठया संख्येने नागरिक व पर्यटक भेट देत असतात.



तामिळनाडू येथील पेरियार मणियम्मई विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेचे (अभिमत विद्यापीठ) कुलपती डॉ. के.वीरमणी यांनी स्मारकाला भेट देत येथील वैविध्यपूर्ण दालनांचे, त्याच्या मांडणीचे व त्यामध्ये जपलेल्या कलात्मकतेचे मनापासून कौतुक केले. स्मारकातील समृद्ध ग्रंथालय हा अभ्यासकांसाठी माहिती व ज्ञानाचा खजिना असून येथील दुर्मिळ छायाचित्र संग्रहालयातील बाबासाहेबांचे जीवन चरित्र पाहून भारावून गेलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.


महत्वाचे म्हणजे हे स्मारक अत्यंत विचारपूर्वक डिझाईन केलेले, सुव्यवस्थित आकर्षक मांडणी असलेले आणि शैक्षणिकदृष्ट्या प्रभावी असल्याचे ते म्हणाले. त्यांनी असेही निरीक्षण नोंदविले की, हे स्मारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, घटनात्मक दृष्टी आणि सामाजिक न्यायाचा संदेश प्रत्येक माणसापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे महत्वाचे काम करते तसेच वर्तमानातील व भावी पिढ्यांना संवेदनशील बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतांना दिसते.

या भेटीदरम्यान कुलपती डॉ. के.वीरमणी यांनी स्मारकाविषयीच्या भावना आणि सदिच्छा अंत:करणापासून असल्याचे सांगत यामधून आयुक्तांची दूरदृष्टी आणि समतेची मूल्ये जपण्याची वचनबद्धता दिसून येते असे मत व्यक्त केले. त्यांनी स्मारकासोबत संयुक्त उपक्रम आणि कार्यक्रमांद्वारे शैक्षणिक आणि विद्यापीठीय सहकार्य वाढवण्याची इच्छाही व्यक्त केली.

# चंद्रपुरात पतीने पत्नीला जिवंत जाळल्याची घटना; पोलीस तपास सुरु

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** शहरातील गौतम नगर, महाकाली वॉर्ड येथे पतीने पत्नीला जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना घडली असून उपचारादरम्यान विवाहितेचा मृत्यू झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी चंद्रपूर शहर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करत आरोपी पतीला अटक केली आहे.



यासंदर्भात कमला समय्या भडके (७०), रा गौतम नगर, महाकाली वॉर्ड, चंद्रपूर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची नात दीक्षा शुभम भडके (२७) ही आजीसमवेत राहत होती. दीक्षाचा विवाह पाच वर्षांपूर्वी शुभम राजू भडके (२८) याच्याशी जातीरीतीनुसार झाला होता. मात्र मागील सहा ते सात महिन्यांपासून पती-पत्नीमध्ये सतत वाद व भांडणे होत असल्याने शुभम हा आपल्या आई-वडिलांकडे वेगळा राहत होता.५ जानेवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ८ वाजता कमला भडके या आपल्या बहिणीकडे गेल्या होत्या.

रात्री ९ वाजताच्या सुमारास त्या घरी परतल्या असता घराचा दरवाजा बाहेरून बंद असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यावेळी घरातून दीक्षा मला वाचवा, मला वाचवा' असे जोरजोरात ओरडत असल्याचा आवाज येत होता. दरवाजा उघडून आत प्रवेश केला असता दीक्षा ही गंभीर अवस्थेत विव्हळत होती. तिचे अंगावरील कपडे व केस जळालेले होते. कमला भडके यांनी तात्काळ दीक्षाला दुसरे कपडे घालून दिले. तिच्या आरडाओरडीतून परिसरातील नागरिक जमा झाले.

त्यांच्या मदतीने दीक्षाला रिक्षातून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र उपचार सुरू असताना ७ जानेवारी २०२६ रोजी दीक्षाचा मृत्यू झाला. या प्रकरणी सुरुवातीला चंद्रपूर शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०९(१) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. मात्र दीक्षाचा मृत्यू झाल्यानंतर गुन्ह्यात कलम १०३ अंतर्गत खुनाचा गुन्हा वाढविण्यात आला आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी शुभम राजू भडके याला अटक केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक निशिकांत रामटेके करीत आहेत.

# गोड गळ्याचे गायक ; येसुदास

आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८६ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते.

त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले.

येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अम ोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसम वेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा म ानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत.

येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील



चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# हिमायतबागेची हाक !



छत्रपती संभाजीनगरच्या मधोमध असलेल्या शाही उद्यान 'हिमायतबाग' सतराव्या शतकात आकारास आल्याचे सांगितले जाते. या कालखंडात छत्रपती संभाजीनगरमध्ये विस्तीर्ण उद्याने, इमारती, दरवाजे उभारण्यात आले. जवळपास ३०० एकरांचा हिमायतबाग परिसर आहे. वैविध्यपूर्ण घनदाट झाडी, विस्तीर्ण हौद, कारंजे, निवाससासाठी खोल्या आणि विपुल जैवविविधता अशी बागेची वैशिष्ट्ये होती. पुढे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे हिमायत बाग फळ संशोधन केंद्र येथे स्थापन झाले. कृषी संशोधनात महत्त्वपूर्ण कामगिरी करणारी मंडळी संशोधनासह हिमायतबाग टिकवण्याचा प्रयत्न कसोशीने करत आहेत. मात्र, शहराच्या मधोमध, मोक्याच्या ठिकाणी असलेल्या हिमायतबागेची जमीन काही जणांच्या नजरेस पडली आणि आता तिथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे.

१०९ हेक्टर जमीन वाचवून बागेचे वैविध्य टिकवणे आव्हानात्मक आहे. बागेच्या तीन बाजूंनी अतिक्रमणे वाढत आहेत. महापालिका, पोलिस प्रशासन, राजकीय मंडळींना हे सर्व उघड्या डोळ्यांनी दिसूनही फारशा हालचाली केल्याचे दिसत नाही. नाही म्हणायला, मुख्य रस्त्यालगतची काही अतिक्रमणे हटविली गेली; पण पश्चिमेकडून होणारी अतिक्रमणे रोखण्यावर अजूनही उपाययोजना झालेल्या नाहीत.

केशर आंबा व मोसंबी गुणवत्ता केंद्राने मराठवाड्यासाठी मोठे काम केले आहे. इंडो-इस्रायल प्रकल्पांतर्गत केशर आंब्याची गुणवत्ता वाढविली जात आहे. दर वर्षी आंब्याची दर्जेदार रोपे शेतकऱ्यांना पुरविली जातात. यंदा एक लाख रोपांची निर्मिती करण्यात संशोधन केंद्राला यश आले. मराठवाड्यात कोरडवाहू फळबागांना संशोधन केंद्राने चालना दिली आहे. चिंच, कवठ, बोर, पेरू, सीताफळ, जांभूळ फळबागांची लागवड वाढली आहे. चिंचेच्या 'शिवाई' वाणाला पेटंट मिळाले आहे. रोपनिर्मितीत गुणवत्ता राखल्यामुळे शेतकऱ्यांची हिमायतबागेत वर्दळ असते. मराठवाड्यात फळबाग लागवडीसाठी संशोधन केंद्र दिशादर्शक ठरले आहे. सध्या बागेची देखभाल करण्यासाठी पुरेसे कर्मचारी नाहीत. त्यातून बागेला बकालपण आणि जुन्या वास्तूंना अवकळा आली आहे. कारंजे असलेला हौद धूळ खात पडला आहे. ही वास्तू राज्य पुरातत्त्व विभागाच्या संरक्षित स्मारकांच्या यादीत आहे. त्यांच्या दुर्लक्षामुळे बहुतांश वास्तू जर्जर झाल्या आहेत.

मध्यंतरी वृक्षतोड वाढल्यामुळे हिमायतबाग उजाड होण्याचा धोका निर्माण झाला होता. याबाबत दाखल जनहित याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने कृषी विद्यापीठाला हिमायतबागेत जैवविविधता प्रकल्प सुरू करा, अशी सूचना केली होती. कारण, दीडशेपेक्षा जास्त प्रजातींचे पशू-पक्षी, शंभर ते तीनशे वर्षे जुनी झाडे, वेली, फुले यांनी समृद्ध बाग जैवविविधतेचे उत्तम उदाहरण आहे. छत्रपती संभाजीनगर शहराचे फुप्फुस अशी हिमायतबागेची जुनी ओळख आहे. घनदाट झाडे असल्यामुळे सकाळी आणि सायंकाळी फेरफटका मारण्यासाठी 'आरोग्यप्रेमीं'ची गर्दी असते. गर्दीसोबतच 'हौशी' लोकांचीही घुसखोरी होते. झाडांना इजा पोहचवणे, व्यसन करणे, संशोधन केंद्राच्या वस्तूंची चोरी, तोडफोड असा उपद्रव वाढलेला आहे. बागेचा विस्तार पाहता अधिक सुरक्षारक्षकांची गरज असताना कमी मनुष्यबळावर काम निभावून नेले जात आहे.

जैवविविधता, कृषी संशोधन, ऐतिहासिक वारसा, पर्यावरण या पैलूंचा विचार करता हिमायतबाग वाचविणे काळाची गरज आहे. या केंद्रात ९५ पदे मंजूर असून सद्यस्थितीत २१ पदांवर कर्मचारी आहेत. तर तब्बल ७४ पदे रिक्त आहेत. बागेत संशोधन, लागवड, संगोपन, संरक्षण करण्यासाठी मनुष्यबळ नाही. त्यामुळे बागेत घुसलेली मोकाट जनावरे शास्त्रज्ञांनी हुसकावीत का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. बागेच्या संरक्षणासाठी पुरेसे मनुष्यबळ नेमणे, संरक्षण भिंतीसाठी निधी देणे, कृषी संशोधन केंद्रात शास्त्रज्ञ-कर्मचारी नेमणे, फळबागेसाठी उपलब्ध रोपांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करणे आणि हिमायतबाग नावाचा वारसा टिकविण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेण्याची गरज आहे; अन्यथा हा दुर्लक्षित वारसा काळाच्या ओघात कायमचा उजाड होईल.

## लक्षवेधी

मुंबई महानगरपालिकेचे मतदान १५ जानेवारीला येऊन ठेपला असता... मुंबई महानगरपालिका मार्फत मतदान जनजागृती निमित्त कर मतदान संविधान सांगतय हा फलक मुंबई महानगरपालिका हाकेच्या अंतरावर व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस च्या समोर विजेच्या खांबाला लटकलेला हा बोलका बोर्ड चक्क उलटा झाला आहे.... खरंच मतदार राजाला निवडून आल्यानंतर उमेदवार मतदारांना उलटा तरी करणार नाही ना...!!

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले**
**एक मतदार राजा**




# नववर्षात व्यसनमुक्त जीवन जगूया...

नुकतेच जुने वर्षे संपून नवीन वर्षे सुरू झाले आहे. प्रत्येकाने जुन्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाचे स्वागत, अगदी जल्लोषात, धुमधडाक्यात व फटाक्याच्या आतषबाजीत केले आहे. प्रत्येक जण नवीन वर्षात नवनवीन संकल्प आत्मसात करण्याचा प्रयत्न करत असतो. काहीजण संकल्प आत्मसात करून तसे आचरण करण्याचा प्रयत्न करतात. तर काहीजण संकल्प आत्मसात करून देखील आचरणात आणत नाहीत.

सध्या आपल्या देशात व्यसनाधीन लोकांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. लहान मुलांपासून ते वयोवृद्ध माणसांपर्यंत प्रत्येकजण व्यसन करताना आपल्याला दिसत आहे. माणूस वेगवेगळ्या प्रकारचे व्यसन करून मृत्यूला जवळ करत आहे. आपल्या देशात जवळपास ९०% लोक व्यसनाधीन झाले आहेत. माणसाला व्यसनाचे परिणाम माहित असून देखील माणूस व्यसन करतो. व्यसनी लोकांच्या घराची अवस्था व त्यांची खाण्यापिण्याची आबाळ पाहून तसेच त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचा खर्च पाहून म ाणसाचे मन गहिवरून जाते. व्यसनामुळे कित्येक माणसांचे संसार रस्त्यावर आले आहेत.

ज्या घरातील बाप व्यसनी असतो त्या घरात सुख शांती कधीच लाभत नाही. व्यसनाधीन माणसाच्या घरी दररोज भांडण तंटे होत असतात. व्यसनाधीन लोकांच्या बायका घटस्फोट घेऊन नवऱ्यापासून वेगळ्या राहतात. पती दारुडा निघाल्यामुळे कित्येक महिला पतीच्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून पतीला सोडचिठ्ठी देऊन मोकळ्या होत आहेत. दारुड्या माणसाच्या मुलाबाळांना आई वडील असून देखील त्यांना लावारिस फिरावे लागत




आहे. व्यसनाचे हे एवढे मोठे परिणाम माहित असून देखील माणूस मनसोक्त व्यसन करून आनंदाने जीवन जगत असतो.

आपला भारत देश व्यसनाच्या विळख्यात अडकल्यामुळे भारताचे अतोनात नुकसान होत आहे. विशेष करून तरुण पिढी व्यसनाच्या अधिक आहारी गेल्यामुळे याचा परिणाम थेट देशाच्या विकासावर होत आहे. आपल्या देशातील तरुण हे आपल्या देशाची खरी ताकद असते. आपला देश तरुणांच्या बळावर बलशाली ठरला जातो. परंतु हेच तरुण जर दारू, गांजा, सिगारेट, तंबाखू व सुपारी खाऊन स्वतः चे आयुष्य उध्वस्त करत असतील तर मग ही लोकशाही प्रधान देशासाठी फार मोठी धोक्याची घंटा आहे. आपले शासन व्यसनाचे दुष्परिणाम भारतीयांना सांगत असतो. दारू पिल्याने व व्यसन केल्याने काय परिणाम होतात? व म ाणूस कसा नेस्तनाबूत होत जातो, हे सरकार आपल्याला पुळक्याने आवर्जून सांगत असते.

परंतु दारू, गुटखा, तंबाखू, सुपारी, सिगारेट व गांजा यांच्यावर कायमस्वरूपी बंदी का घालत नाही? शासनाला देशातील लोकांचा एवढा पुळका येत असेल तर अगोदर त्याने सर्व प्रकारचे गुटखे व सर्व प्रकारच्या नशा बंद केल्या पाहिजेत? एकीकडे व्यसन करू नका म्हणून सांगायचे आणि दुसरीकडे अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी व्यसनाला प्राधान्य द्यायचे. शासनाचे असे हे दुटप्पी खेळ कुठवर चालणार? प्रत्येकाने व्यसनामुळे आपल्या घरावर काय परिणाम होतात? व्यसनामुळे माणूस कसा कायमचा संपत जातो? याचा अगोदर विचार केला पाहिजे. व्यसनामुळे एक तर आपली पत्नी आपल्या जवळ नांदायला तयार नसते. व्यसनाम ुळे कित्येक लोकांचे संसार उघड्यावर आले आहेत. व्यसनामुळे मरण पावणाऱ्या लोकांचा आकडा दिवसेंदिवस वाढत चालला आहे.

देशात सर्वात जास्त दारूमुळे मृत्यू होत असल्याचे एका अहवालात प्रसिद्ध झाले आहे. दारू पिणाऱ्या लोकांमुळे आपल्या देशाची ताकद कमी होत चालली आहे. आपल्या देशाला बलशाली व मजबूत बनवायचे असेल तर अगोदर प्रत्येकाने व्यसनाला मुठमाती देऊन दारू ऐवजी दूध पिऊन स्वतःला बलशाली बनवावे आपोआपच देश सुद्धा बलशाली होत जाईल. त्यासाठी समस्त व्यसनी बांधवांना मी सांगू शकतो की, बांधवांनो, व्यसनापासून चार हात लांब राहून व्यसनमुक्त जीवन जगा, आतापर्यंत आपण अनेक प्रकारचे व्यसन केले असेल. दारू, गांजा, सिगारेट व तंबाखू यांचे सेवन केले असेल तर नवीन वर्षाच्या निमित्ताने आपण सर्वांनी मिळून संकल्प करूया की, आपण आता व्यसनाला मुठमाती देऊन निर्व्यसनी जीवन जगूया...व्यसनी लोकांचे वाढते प्रमाण ही देशासाठी फार मोठी धोक्याची घंटा आहे... आपण व्यसन करून स्वतःचे आरोग्य धोक्यात घालत आहोत... देशाच्या विकासाला हातभार लावायचा असेल तर तरुणाई धष्टपुष्ट व मजबूत असली पाहिजे.

परंतु दुर्दैवाने आमची तरुणाई व्यसनाच्या आहारी जाऊन अशक्त बनत चालली आहे... म्हणून मला वाटते की, नवीन वर्षाच्या निमित्ताने आपण सर्वांनी व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संकल्प केला तर खऱ्या अर्थाने देशाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. हीच या निमित्ताने माझी आपल्याला कळकळीची नम्र प्रार्थना आहे.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## मैत्री...

समस्त रस्ते बंदिस्त
रात्रंदिवस खुलेमैत्री
विश्वासनिवासस्थान
फक्तइथे असे खात्री

मित्र रूपांत देव भेटे
का जायचे तिर्थक्षेत्री
सन्मित्र सदैव मदती
अ दृश्य स क्षम छत्री

इजा होता एखाद्यांस
आसवे दुजांच्या नेत्री
मित्र स्वता एक गिता
कन्हैया बने कुरुक्षेत्री

स्वर्ग सृष्टि हेला मात्री
जसा सूर्य चंद्र नक्षत्री
दावे गुण दोष न दिसे
अतिसूक्ष्मदर्शक यंत्री

अहंकार मित्रासनाही
उपकारांची जरीजंत्री
दिले अन विसरु गेले
जसेदान असेसत्पात्री

मित्रास द्याया सर्वस्वी
द्रौपदीच्याअक्षयपात्री
मित्रांमध्ये दडलाअसे
न्यायमूर्ती राम शास्त्री

दोस्तीअंगी स्फुल्लिंग
शक्ती अद्भुतब्रह्मास्त्रि
साथीसअसे सखाजर
भय नुरते किंचिन्मात्री

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयात सुजन फाऊंडेशनवतीने साऊ-जिजाऊ वैचारिक उत्सव



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०९, खंडाळा (सातारा) :** खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयाचा राज्यशास्त्र विभाग आणि सुजन फाऊंडेशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०८ जानेवारी २०२६ रोजी ०३ जानेवारी सावित्रीआई जयंती आणि १२ जानेवारी राजमाता जिजाऊ जयंती निमित्त क्रांतिज्योती सावित्रीआई आणि क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले यांची प्रतिमा वितरित करत वैचारिक उत्सव साजरा करण्यात आला.वैचारिक प्रसारण उपक्रमाचे प्रास्ताविक करताना राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार म्हणाले-आजच्या जेन झी पिढीला आपल्या क्रांतिकारक पूर्वजांचा इतिहास आणि वैचारिक परिवर्तनाची परंपरा समजून घेण्यासाठी कृती-उपक्रमाची आवश्यकता आहे, याचाच एक भाग म्हणजे प्रतिमा वितरण करण्यासाठी सुजन फाऊंडेशन यांचे योगदान मोलाचे ठरत आहे. सुजन फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष अजित जाधव म्हणाले-आपल्या देशातील क्रांतिकारी इतिहासात महापुरुष आणि महान स्त्रियांचे योगदान अद्वैत असून त्यांच्या असमान कार्याची माहिती तरुणाईने स्मरावी यासाठी क्रांतिकारी दाम्पत्य फुले यांची प्रतिमा वितरण आणि विचार प्रसारण समारंभ आहे. गाव, शहरातून वैचारिक प्रसारणाचे कृती-उपक्रम व्हावेत आणि तरुणाईने पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना फुले दाम्पत्य प्रतिमा वितरित करण्यात आल्या. समारंभाचे आभार इतिहास विभाग प्रा.रोहिणी मोरे यांनी केले. यावेळी कला, वाणिज्य, विज्ञान व बीसीए विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## स्वाभिमानी नाभिक संघटनेची आज बैठक

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०९, पाटण (सातारा) :** महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी नाभिक संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ रोजी हॉटेल कुबेर छाया, बोरगाव, ता.जि.सातारा येथे बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत पदाधिकाऱ्यांच्या नव्याने निवडी करण्यात येणार असल्याची माहिती सातारा जिल्हा अध्यक्ष अधिकराव चव्हाण यांनी दिली. या बैठकीत राज्य कार्यकारिणी, पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी, जिल्हा कार्यकारिणीतील सर्व पदाधिकाऱ्यांच्या संघटनेचे संस्थापक राज्य अध्यक्ष शंकरराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पुढील ५ वर्षाकरिता नव्याने निवडी करण्यात येणार आहेत. सर्व स्वाभिमानी नाभिक संघटनेचे वरिष्ठ पदाधिकारी आणि शूरवीर जिवाजी महाले उत्सव समिती, किल्ले प्रतापगड समितीतील सर्व पदाधिकारी यांनी शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल कुबेर छाया बोरगाव, ता.जि.सातारा येथे बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन चव्हाण यांनी केले आहे.

## औज (मंद्रूपचे) सलमानताज यांची उपमहानिरीक्षक पदी पदोन्नती



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०९, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज (मंद्रूप) चे सुपुत्र आणि उत्तर प्रदेश केडरचे आयपीएस अधिकारी सलमानताज जाफरताज पाटील यांची उत्तर प्रदेश पोलीस दलामध्ये उपमहानिरीक्षकपदी (डीआयजी) पदोन्नती झाली आहे. सलमानताज पाटील हे केंद्रीय गुप्तहेर प्रशिक्षण संस्था (ढ़ृढख), हैदराबाद येथे संचालक (ॠळॲशलीँॲ) म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील विविध राज्यांतील पोलीस अधिकाऱ्यांसाठी सायबर सुरक्षा, नवीन फौजदारी कायदे तसेच दहशतवाद विरोधी प्रशिक्षण यांसारख्या अत्याधुनिक विषयांवर प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले. दक्षिण सोलापूर तालुक्यासारख्या औज गावातून पोलीस उपमहानिरीक्षकपदी नियुक्ती झालेले सलमानताज यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. याशिवाय सोलापूर शहरातील पहिले मुस्लीम आयपीएस अधिकारी होण्याचा मान त्यांनी मिळविला आहे. सोलापूर येथील सेंट जोसेफ हायस्कूल येथे त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी यूपीएससी परीक्षेत यश मिळवून प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते जाफरताज पाटील यांचे पुत्र असलेले सलमानताज पाटील यांनी कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर पोलीस दलात अल्पावधीत मोठ्या पदापर्यंत झेप घेतली आहे.

## रयत इंग्लिश मीडिअम स्कूलमध्ये डोळे तपासणी शिबिराचे आयोजन




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०९, खंडाळा (सातारा) :** रयत इंग्लिश मीडिअम स्कूल, शिरवळ येथे विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी कमला मेहता हॉस्पिटल येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थिती दर्शविली. या शिबिरात डॉ.सुनील कुलकर्णी, डॉ.वर्षा राऊत, डॉ.उर्मिला चव्हाण, डॉ.तुषार बनसोडे व डॉ. केतन ढांइजे यांनी इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची सखोल डोळे तपासणी केली. तपासणी दरम्यान विद्यार्थ्यांच्या दृष्टीतील त्रुटी, डोळ्यांची कमजोरी, डोळे दुखणे, पाणी येणे इत्यादी समस्यांची तपासणी करण्यात आली. आवश्यक त्या विद्यार्थ्यांना पुढील उपचार व चष्मा वापरण्याबाबत योग्य मार्गदर्शन देण्यात आले. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांच्या डोळ्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत या शिबिरात अत्यंत सुस्पष्ट व परिणामकारक मार्गदर्शन करण्यात आले त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे आणि शाळेच्या पर्यवेक्षिका वासंती घाडगे तसेच शिक्षकवृंद व पालकांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले व डॉक्टरांचे आभार मानले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या व्यवस्थापन समितीचे व कमला मेहता हॉस्पिटलच्या डॉक्टरांचे विशेष सहकार्य लाभले.

# पारनेर - नगर तालुक्यातील शेत पानंद रस्त्यांना मंजुरी - आ.दाते

## मनरेगा अंतर्गत ५० हून अधिक शेत पानंद रस्त्यांना मंजुरी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेले आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रभावी पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून मनरेगा अंतर्गत मातोश्री ग्राम समृद्धी शेत / पानंद रस्ते योजना २०२५-२६ अंतर्गत पारनेर व नगर तालुक्यातील ५० हून अधिक शेत व पानंद रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली असून, यामुळे हजारो शेतकरी व ग्रामस्थांना थेट लाभ होणार आहे.



या मंजुरीमध्ये पिंपळगाव रोठा, देवीभोयरे, निघोज, पिंपळनेर, पाडळी तर्फे कान्हूर, म्हस्केवाडी, पाबळ, पोखरी, लोणी हवेली, भांडगाव, सारोळा अडवाई, चिंचोली, जामगाव, माळकुप, निमगाव घाणा, कर्जुले हर्या, भोंद्रे, सावरगाव, कडूस, म्हसोबा झाप, काटाळवेढा, पाडळी रांजणगाव, कळमकरवाडी, वडनेर, कोहोकडी, गाडीलगाव, तिखोल, हिंगणगाव, लोणी मावळा, नेप्ती, जवळे, पळशी, पाडळी आळे, बुगेवाडी, वडगाव गुंड आदी अनेक गावांतील शेत रस्ते व पानंद रस्त्यांचा समावेश आहे. या रस्त्यांमुळे पावसाळ्यात तुटणारा संपर्क कायमस्वरूपी सुटणार असून शेतीमाल वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे. शेत व पानंद रस्त्यांमुळे शेतीत यांत्रिकीकरणाला मोठी चालना मिळणार आहे. ट्रॅक्टर, हार्वेस्टरसारखी अवजारे थेट शेतात नेता येणार असून पेरणी, मशागत, कापणी व मळणीसारखी कामे कमी वेळेत व कमी खर्चात पूर्ण होणार आहेत. पक्के रस्ते झाल्यामुळे पावसाळ्यातही शेतीची कामे अखंड सुरू राहतील. विशेष म्हणजे या रस्त्यांना कायदेशीर मान्यता व डिजिटल (GIS) नोंद मिळणार असल्याने अतिक्रमणे हटतील, वाद टळतील आणि शेत जमिनींच्या सीमा स्पष्ट होतील.

ग्रामीण दळणवळण, रोजगारनिर्मिती, शेती उत्पादनवाढ आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे या उद्देशाने आमदार काशिनाथ दाते यांनी संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यातूनच ही भरीव आणि दूरगामी लाभ देणारी मंजुरी मिळाल्याचे बोलले जात आहे. या ऐतिहासिक मंजुरीबद्दल आमदार दाते यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्यासह सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# आमदार दातेंच्या संकल्पनेतून गाव विकासाला नवी दिशा - दिलीप दाते

## मांडवे खुर्द येथे ८४ लक्ष रुपयांचे विकासकामांचे भूमिपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते यांच्या विशेष प्रयत्नातून मांडवे खुर्द येथे मंजूर झालेल्या विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. आमदार दाते अनुपस्थित असल्याने त्यांच्या वतीने त्यांचे चिरंजीव दिलीप दाते व डॉ.प्रदीप दाते यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी दिलीप दाते बोलत होते.

या विकास कामांमध्ये हनुमान मंदिर सभामंडप बांधकाम करणे - २० लक्ष, कडाईमाता केटवेअर दुरुस्ती करणे - १५ लक्ष, उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण करणे - २९ लक्ष, गावठाण सभामंडप करणे - १० लक्ष तसेच राज्य मार्गापासून पवार वस्तीपर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे - १० लक्ष आदी कामांचा समावेश असून, यामुळे मांडवे खुर्दच्या सामाजिक, धार्मिक व दळणवळण सुविधांना मोठी चालना मिळणार असून आमदार सरांच्या संकल्पनेतून गाव विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचे दिलीप दाते यांनी सांगितले.



भूमिपूजनप्रसंगी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन बाबासाहेब खिलारी, पारनेर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरचिटणीस अमोलभाऊ रोकडे, युवक तालुका उपाध्यक्ष शुभम टेकुडे, मांडवे खुर्दचे माजी सरपंच सोमनाथ आहेर, श्रीरंग पाटील गागरे, ग्रामपंचायत सदस्य गौतम बागुल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव, भाऊसाहेब गागरे, हेमंत गागरे, चेअरमन संतोष टेकुडे, औटी, विठ्ठल गागरे, गोरख मिंडे, पोपट गागरे, सोपान आहेर, साहेबराव वाडेकर, तुकाराम बागुल, दिलीप जाधव, शरदराव गागरे, बाळासाहेब जाधव, जगन्नाथ जाधव, विनायक जाधव, संपत गागरे, विनोद गागरे, अण्णासाहेब गागरे, मंगेश गागरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आमदार काशिनाथ दाते यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाचे कौतुक करत, मांडवे खुर्दच्या सर्वांगीण विकासासाठी अशीच कामे भविष्यातही व्हावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली. भूमिपूजन सोहळ्यामुळे संपूर्ण गावात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# ७० वर्षाच्या वयोवृद्धला लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण

## पाटण पोलिसांनी केला अदखलपात्र गुन्हा

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०९, पाटण (सातारा) :** दिवशी खुर्द ता.पाटण येथील ७० वर्षांचे वयोवृद्ध चंद्रकांत अमृतराव साळुंखे हे मैस चारण्यासाठी शिवारात गेले असता त्या ठिकाणी जाऊन नंदकुमार गोविंद जगताप रा.धारेश्वर दिवशी, वामन देसाई रा.संगमनगर धक्का ता.पाटण, गौरव पूर्ण नाव माहित नाही रा.तारळे, ता.पाटण या तिघांनी गाडीचे भाडे देण्याच्या कारणावरून चंद्रकांत साळुंखे यांना लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. या मारहाणीत त्यांच्या डोक्यावर, मानेवर आणि कानावर जबर मुक्का मार लागला आहे. या बाबत चंद्रकांत साळुंखे यांनी पाटण पोलिसांत तक्रार दिली असून पाटण पोलिसांनी त्यांची तक्रार अदखलपात्र गुन्ह्यामध्ये नोंदवली आहे.

७० वर्षांच्या वयोवृद्धला तरुणांकडून होणारी मारहाण ही अशोभनीय बाब असताना या मारहाणीत चंद्रकांत साळुंखे यांना काही बरेवाईट झाले असते तर याला जबाबदार कोण राहिले असते याचा सारासार विचार करून पोलिसांनी दखलपात्र गुन्हा दाखल करण्याची मागणी वयोवृद्ध तक्रारदार व नातेवाईकांनी केली होती. मात्र पोलिसांनी काही एक न ऐकता या तक्रारीची नोंद अदखलपात्र गुन्ह्यात केली. यामुळे दादागिरी व मारहाण करणाऱ्या तरुणांवर पोलिसांचा व कायद्याचा वचक राहणार का..? हा अनेकांच्या मनात उपस्थित होत आहे. याबाबत तक्रारदार चंद्रकांत साळुंखे यांनी सांगितल्या माहिती वरून ते गुरवारी सायंकाळी दिवशी येथील तरळकीचे टेक नावाच्या शिवारात म्हैस चारण्यासाठी गेले होते. याठिकाणी जाऊन नंदकुमार गोविंद जगताप रा. धारेश्वर दिवशी, वामन देसाई रा.संगमनगर धक्का ता.पाटण, गौरव पूर्ण नाव माहित नाही रा. तारळे यांनी गाडीचे भाडे देण्याच्या कारणावरून लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. या मारहाणीत त्यांच्या डोक्यावर, मानेवर आणि कानावर जबर मुक्का मार लागला आहे. या मारहाणीत ते काही काळ बेशुद्ध अवस्थेत पडले होते. शुद्धीवर आल्यानंतर त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालय पाटण येथे उपचारासाठी आणले व तेथून पोलिसांत तक्रार दाखल करण्यासाठी पोलिस स्टेशनला आणले असता त्यांची वयोवृद्ध अवस्था पाहून पोलिसांनी गुन्हा दाखल करायला हवा होता. मात्र तो अदखलपात्र गुन्हा नोंद झाल्याने न्यायाची अपेक्षा ठेवायची कोणाकडे असे मत स्वतः चंद्रकांत साळुंखे व त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली.

## निफाड तालुक्यात वाढत्या थंडीचा पहिला बळी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी घट होत असून कडाक्याच्या थंडीचा फटका नागरिकांना बसत आहे. या वाढत्या थंडीमुळे यावर्षीचा पहिला दुर्दैवी मृत्यू नोंदला गेला असून देवगाव (ता.निफाड) येथील २२ वर्षीय युवकाचा थंडीत काकडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.



देवगाव येथील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाजवळ आज शुक्रवार दि.९ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास समीर दौलत सोनवणे (वय २२) हा युवक मृतावस्थेत आढळून आला. पोलिस पाटील सुनिल बोचरे यांनी लासलगाव पोलिसांना तात्काळ खबर दिली. माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्करराव शिंदे, पोलीस हवालदार संदीप शिंदे व औदुंबर मुरडनर यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी लासलगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. शवविच्छेदन प्राथमिक अहवालानुसार अति थंडीमुळे हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने युवकाचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी लासलगाव पोलिस ठाण्यात गु.र.नं. ०१/२०२६ भा. न्या.संहिता कलम १९४ प्रमाणे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेषतः रात्रीच्या वेळी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी केले आहे.

## तुळजापूर विकास आराखड्याच्या पहिल्या कामांच्या रु. ५५५ कोटी निविदेस मान्यता

**अक्षराज : विश्वास नायगांवकर**

**दि.०९, तुळजापूर (धाराशिव) :** कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून नावारुपाला यावे यासाठी घेतलेले परिश्रम आता वास्तवात येत आहेत. आपल्या महायुती सरकारने तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आरखड्यासाठी १८६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यातील ५५५ कोटी ८० लाख रुपयांच्या प्रमुख चार पहिल्या कामांच्या निविदेस आज मान्यता देण्यात आली आहे. आज पालकमंत्री ना. प्रतापजी सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्थरीय बैठकीत घेतलेले हा निर्णय म्हणजे आपल्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने पडलेले महत्वपूर्ण पाऊल असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र मंत्रिमंडळाची एक विशेष बैठक ६ मे २०२५ रोजी त्यांचे जन्मस्थळ असलेल्या चौंडी येथे झाली होती. त्यावेळी सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रांसाठी ५,५२० कोटींच्या विकास कामांना मंजुरी देण्यात आली होती. त्यात तीर्थक्षेत्र तुळजापूर विकास आराखड्यास १३०० कोटींचा निधी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी जाहीर केला होता. अंतिम अहवालात हा आराखडा १८६५ कोटी इतका मंजूर करण्यात आला. त्याअंतर्गत ५५५ कोटी ८० लाख रुपयांच्या कामांना मान्यता मिळाली असून या कामांची निविदा प्रक्रियाही तातडीने सुरू करण्यात आली आहे. मान्यता देण्यात आलेल्या कामात प्राधान्याने घाटशीळ पार्किंग येथे भाविक सुविधा केंद्र आणि बहुउद्देशीय वाहनतळ उभारणी यासाठी ७७.०२ कोटी रुपये, हडको पार्किंग परिसरात सुविधा केंद्र, व्यावसायिक संकुल, बहुउद्देशीय सभागृह तसेच वाहनतळ उभारण्यासाठी ३७६.३३ कोटी रुपये, आराधवाडी पार्किंग याठिकाणी सुविधा केंद्रासाठी ४५.४३ कोटी रुपये आणि शहरातील जुन्या बस स्थानक परिसरात भाविक सुविधा केंद्रासाठी ५७.२३ कोटीं रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# ११ जानेवारीला कलेचा जागतिक उत्सव

## १२४ केंद्रांवर आंतरराष्ट्रीय स्पर्धा; लाखो विद्यार्थ्यांचा सहभाग





रंगोत्सव सेलिब्रेशनच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांच्या मनातील सृजनशीलतेला आणि कलागुणांना प्रोत्साहन देतो. गेल्या १३ वर्षांत लाखो मुले या व्यासपीठावर आपली कला जगासमोर आणली आहेत. आमचे ध्येय आहे की, प्रत्येक मुलाला कलेच्या रंगांत रंगता यावे. त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि ते जगाकडे सकारात्मक दृष्टीने पाहतील. रंगोत्सव हा केवळ स्पर्धा नव्हे, तर कलेचा उत्सव आहे जो मुलांच्या भविष्याला आकार देतो.

**– संग्राम दाते (संचालक, रंगोत्सव सेलिब्रेशन)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, अहिल्यानगर :** रंगोत्सव सेलिब्रेशन ही संस्था २०१२ पासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कला स्पर्धांचे यशस्वी आयोजन करीत आहे. संस्थेचे संचालक संग्राम दाते यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या १३ वर्षांत या स्पर्धांनी लाखो विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव दिला आहे. राष्ट्रीय स्पर्धांमध्ये १५ लाखांहून अधिक तर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये २ लाखांहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

या स्पर्धा केवळ भारतातच नव्हे तर दुबई, टांझानिया, भूतान, मलेशिया, टोकियो, मालदीव अशा अनेक देशांमध्ये आयोजित झाल्या आहेत. रंगोत्सव सेलिब्रेशन देशभरातील कलाप्रेमी विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ बनली आहे, जे त्यांच्या कलेची ओळख जगभरात करून देते. यंदा, २०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय कला स्पर्धा भारतातील १२४ केंद्रांवर ११ जानेवारी रोजी आयोजित होणार आहे. तर जम्मू-काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या विशेष केंद्रांवर १८ जानेवारी रोजी विशेष स्पर्धा घेण्यात येणार आहे.

या स्पर्धांमध्ये रंगभरण, हस्ताक्षर, चित्रकला, अशा विविध श्रेणींचा समावेश असतो. रंगोत्सवच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढतो. संस्था कलेच्या महत्त्वाला अधोरेखित करून विद्यार्थ्यांना सृजनशीलतेने जगाकडे पाहायला शिकवते. या स्पर्धेत सहभागी होऊन विद्यार्थी आपली कला जगासमोर आणू शकतात. रंगोत्सव सेलिब्रेशन कलेच्या रंगांत रंगलेला हा उत्सव खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा सण ठरला आहे.

## कुंडलवाडीत अय्यप्पा स्वामींचा ईरमुडी कार्यक्रम सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०९, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील कुंडलेश्वर मंदिराच्या पवित्र पावन भूमीत श्री अय्यप्पा स्वामींचा ईरमुडी कार्यक्रम मोठ्या भक्तिमय वातावरणात पार पडला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा कार्यक्रम हजारो भक्तांच्या सानिध्यात पार पडला. यावेळी कुंडलवाडी व परिसरातून आलेल्या गावातून भक्त या कार्यक्रमात उपस्थित होते. कुंडलवाडी नगरीत सर्वात अगोदर या आयपा स्वामीची माळा दीक्षा घेणारे सुरेश दुगमोड गुरूस्वामी या अध्यात्माचे बीज पेरले, त्याच बीजाचे अंकुर होऊन त्याचं रोपट्यात रूपांतर झालं आणि आज याच रोपट्याचे रूपांतर मोठ्या वटवृक्षात झाले आहे. सुरेश दुगमोड गुरूस्वामी यांनी वीस वर्षांपूर्वी हे अध्यात्माचे बीज पेरले होते. त्यांचे माळा दीक्षेचे वीस वर्षे पूर्ण झाले आहेत तसेच कुंडलवाडी व परिसरात सुपरिचित असलेले व्यक्तिमत्व वसंत गुरूस्वामी यांच्या माळधारणेला १८ वर्षांचा १०८ दिवसाचा गौरवपूर्ण टप्पा पूर्ण झाल्याने या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

कुंडलवाडी व परिसरामध्ये या माळा दिक्षेचे या अध्यात्माचे वटवृक्षात रुपांतर करण्यात या परिसरात अध्यात्माचे वातावरणात करण्यात वसंत गुरुस्वामी यांचे मोलाचे आध्यात्मिक कार्य आहे. अय्यप्पा स्वामींच्या भक्तांनी ४१ दिवस कठोर नियम, संयम व श्रद्धेने माळधारण करून व्रत आचरले. व्रतपूर्तीनंतर केरळ येथील प्रसिद्ध अय्यप्पा स्वामी मंदिरात दिव्य ज्योतीचे दर्शन घेण्यासाठी सर्व माळधारी दिक्षा घेतलेले स्वामी केरळकडे रवाना झाले आहेत.

४१ दिवसांचे व्रत यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास शहरातील मोठ्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती होती. सांगता म्हणून शहरातील विविध भागातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण परिसर स्वामीये शरणम् अय्यप्पाच्या जयघोषाने भक्तिमय झाला. कुंडलवाडी व परिसरातील सर्व दिक्षा



धारण केलेल्या स्वामीना मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक श्री रमणाप्रसाद गुरु स्वामी यांच्या हस्ते हा भक्तीमय सोहळा जवळपास १५ वर्षापासून त्यांच्या शुभ हस्ते भक्तीमय वातावरणात पार पडतो. यावेळी नांदेड जि.प माजी सदस्य डॉ.मीनलताई खतगावकर, कुंडलवाडी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार, कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्यासह शहरातील असंख्य भक्तजन उपस्थित होते.

या ठिकाणी नागेश साठे प्रस्तुत सप्तसूर भजनाचे सुंदर आयोजन करण्यात आले. सोबतच दत्ता हमंद, गौतम वाघमारे, प्रकाश खंडेलोटे, सय्याराम, पोतंना करपे, प्रमोद साठे, प्रियांका, अनुराधा पुप्पलवार यांनी सुंदर भजनाचे गायन केलं. त्यावेळी या ठिकाणी मोठया स्वरूपात अन्नदानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.ते योग्य रित्या पार पडले. यावेळी उपस्थित सर्व गावकरी मंडळी, गावातील युवा मित्र परिवार बाजूच्या परिसरातील सर्व भाविक भक्त उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत माळधारण केलेल्या स्वामींना केरळकडे दर्शनासाठी भक्तिभावात रवाना करण्यात आले.

## बातम्या करतांना पत्रकारांनी दुसरी बाजू समजून घ्यायला हवी - उपमुख्य अभियंता रोकडे

### खापरखेडा येथे 'पत्रकार दिन' उत्साहात साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. वाचकांपर्यंत पोहोचणाऱ्या बातम्यामध्ये अनेकदा दुसरी बाजू दिसून येत नाही. त्यामुळे संभ्रम निर्माण होतो. कोणत्याही क्षेत्रातील बातमी देताना तिची पडताळणी करून पारदर्शक पत्रकारिता करणे अपेक्षित आहे.

पत्रकारांनी मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य करावे, असे प्रतिपादन खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता नितीन रोकडे यांनी केले. नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न, खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने ६ जानेवारी रोजी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या चमरी अतिथीगृहात आयोजित 'पत्रकार दिन' कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून द्वीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट पत्रकार म्हणून मयूर तिरपुडे यांचा उपमुख्य अभियंता नितीन रोकडे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्य अभियंता नितीन रोकडे होते. तर अतिथी म्हणून खापरखेडा वीज केंद्राचे कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, ज्येष्ठ भाजप नेते रमेश जैन, जिल्हा उपाध्यक्ष किशोर चौधरी, रिपाई नेते पृथ्वीराज बोरकर, माजी जि.प. सदस्य प्रकाश खापरे, सावनेर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर लांडे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख अशोक झिंगरे, भानेगाव सरपंच सरपंच शालिनी चवरे, खापरखेडा कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष दिलीप बन्सोड, विलास महल्ले, राज तांडेकर, प्रशांत सरोदे, ज्येष्ठ पत्रकार दिवाकर घेर, अमर जैन आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. लोकशाहीच्या



सक्षमीकरणासाठी पत्रकारांनी निःपक्षपातीपणे काम करणे किती आवश्यक आहे, यावर वक्त्यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाला विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अहमद शेख यांनी केले तर संचालन अभय मिश्रा यांनी केले उपस्थितांचे आभार सुनील जालंदर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कपिल वानखेडे, क्रिष्णा नमलेवार, केशव पानतावणे, गिरधारी शर्मा, राजेश खंडारे, श्रीराम सातपुते, श्रीकांत जालंदर, विक्की थापा आदींनी सहकार्य केले.

## थोडक्यात

### पाटण पंचायत समितीच्या कामचुकार अधिकाऱ्यांविरोधात उपोषणाचा 'रासप'चा इशारा



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०९, पाटण (सातारा) :** पाटण पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सातत्याने कामचुकारपणा सुरू आहे. संबंधितांवर तत्काळ कारवाई न झाल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करू, असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे पाटण तालुकाध्यक्ष विकास कदम यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. पंचायत समिती, पाटण अंतर्गत विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी नियमितपणे कार्यालयीन वेळेत उपस्थित राहात नाहीत. अनेकदा उशिरा येणे, कार्यालयीन कामांकडे दुर्लक्ष करणे तसेच दुपारी किंवा वेळेपूर्वीच कार्यालयातून निघून जाण्याचे प्रकार घडत आहेत. या प्रकारांमुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे वेळेत होत नाहीत. अधिकारी, कर्मचारी वेळेवर उपलब्ध नसल्याने फेऱ्या माराव्या लागतात. त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यापूर्वी यासंदर्भात तोंडी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाल्याने शासनाने तत्काळ दखल घेऊन ठोस उपाययोजना कराव्यात. यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करावे, कामचुकार व कार्यालयीन वेळेत अनियमित राहणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी. हजेरी व तपासणी यंत्रणा प्रभावीपणे राबवावी तसेच नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र तक्रार निवारण व्यवस्था सुरू करावी, आदी मागण्यांवर सात दिवसात योग्य निर्णय घेऊन कारवाई न झाल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा विकास कदम यांनी दिला आहे.

### मानवी जीवनात डोळ्यांची निगा महत्वाची - धनंजय साळवे



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ०९ विसापूर (चंद्रपूर) :** शासनाचा प्रयत्न वंचित घटकांना न्याय देण्याचा आहे. मानवी जीवनात डोळे महत्वाचे अवयव आहे. जगाची सुंदरता चांगली न्याहाळता यावी. डोळ्यांची निगा आपण राखली पाहिजे. सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप केले जाणार आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा. याचे कारण म्हणजे मानवी जीवनात डोळ्यांची निगा महत्वाची आहे, असे प्रतिपादन बल्लारपूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी धनंजय साळवे यांनी विसापूर येथे केले. बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा परिषद अंतर्गत बल्लारपूर पंचायत समितीच्या वतीने समाजकल्याण विभागांतर्गत मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी उदघाटक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विसापूरचे उपसरपंच अनेकश्वर मेश्राम होते, तर उदघाटक म्हणून गट विकास अधिकारी धनंजय साळवे, प्रमुख अतिथी बल्लारपूर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.मिना मडावी, विसापूर आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अविशा मडावी, पंचायत समितीचे आरोग्य विस्तार अधिकारी साहेबराव पवार यांची उपस्थिती होती. यावेळी अनुसूचित जाती, जमाती व विमुक्त जाती प्रवर्गातील गरजू लाभार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी तज्ञ नेत्रचिकीत्सकांच्या माध्यमातून करण्यात आली. शेकडोवर रुग्णांना मोफत चष्मे देण्याचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन ग्रामपंचायत लिपिक संतोष निपुंगे यांनी केले. आभार प्रदर्शन अनेकश्वर मेश्राम यांनी केले. यावेळी नेत्र तपासणी करणाऱ्या रुग्णांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### मंद्रूप पोलिसांच्या वतीने पत्रकारांचा सन्मान



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०८, सोलापूर :** पत्रकार दिनाच्या निमित्त मंद्रूप पोलीस प्रशासनाच्यावतीने दक्षिण तालुक्यातील व ग्रामीण भागातील पत्रकारांचा पुष्पगुच्छ देऊन सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार, उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्तविक पंचाक्षरी स्वामी यांनी केले. यावेळी पवार बोलताना म्हणाले, वृत्तपत्र हे समाजाचा आरसा असून पत्रकार हे नेहमीच पीडितांना न्याय देण्याचे काम करीत असतात. पोलीस प्रशासन व मीडिया या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. वृत्तपत्र हे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. कार्यक्रमास तर यावेळी दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष शिवराज मुगळे, दक्षिण सोलापूर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष पंचाक्षरी स्वामी, व जेष्ठ पत्रकार अमोघसिद्ध लांडगे, अमोघसिद्ध मुंजे, रविकांत धनशेट्टी, प्रभू लिंग पुजारी, बालाजी वाघे, बबलू शेख, अमलदार दिनेश पवार, गोपनीय विभागाचे पोलीस अमलदार सागर चव्हाण यांच्यासह विविध दैनिकचे पत्रकार बांधव व पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदिवासी मजुरांची अमानुष हेळसांड; हिवाळ्यात उघड्यावर काढावी लागते रात्र

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०९, डहाणू (पालघर) :** पालघरच्या ग्रामीण आदिवासी भागातील अनेक मजूर कामासाठी स्थलांतर होत आहेत. सध्या गांपाड्यावर नवीन रस्ते तयार करणे, दुरुस्ती आदीकामासाठी अनेक मजूर आपल्या मुलाबाळासह कामानिमित्त बाहेर गावी जात आहे.

मात्र बाहेर मजुरी साठी गेल्यावर त्यांना त्यांचा संसार उघड्यावर मांडावा लागतो. सध्या खंबाळे-वनई-दाभोण रस्त्यावरील वनई मेढीपाडा ते वाणीपाडा दरम्यान जिल्हा परिषद अंतर्गत खडीकरण व डांबरीकरणाचे काम सध्या सुरू आहे. हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी



निश्चितच सोयीचा ठरणार असला, तरी या विकासकामाच्या आड आदिवासी मजुरांवर होत असलेली अमानुष वागणूक संतापजनक ठरत आहे.

या रस्त्याच्या कामासाठी तलावली (ता. विक्रमगड, जि.पालघर) येथून आलेले आदिवासी महिला, पुरुष, तरुणी व लहान मुले मिळून एकूण १३ कामगार असून, लहान मुलांसह एकूण १६ जण काम करत आहेत. कडाक्याच्या थंडीमध्ये लहान मुले झोळीत झोपलेली दिसून येत असून, ही दृश्ये माणुसकीला काळीमा फासणारी आहेत.

कामगारांना निवाऱ्याची योग्य व्यवस्था करणे ही कंत्राटदाराची मूलभूत जबाबदारी असताना, कंत्राटदाराने (नाव अद्याप अस्पष्ट) या मजुरांना कोणतीही सुरक्षितता नसलेल्या उघड्या शेतात ठेवले आहे. चारही बाजूंनी गवत, झाडे व वेली असून साप-विंचूंचा वावर असलेला हा परिसर अत्यंत धोकादायक आहे. याशिवाय, दोन दिवस हे मजूर अंधारातच राहत होते. थंडीच्या दिवसांत लहान मुले उघड्यावर जमिनीवर जेवण करून झोपत असून, सध्या डहाणू तालुक्यात बिबट्याची दहशत असताना अशी परिस्थिती म्हणजे त्यांच्या जीवाशी थेट खेळ आहे. या पार्श्वभूमीवर कंत्राटदारांची माणुसकी मेलेली आहे की आदिवासी समाजाविषयीच्या संवेदना संपल्या आहेत? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

या प्रकरणी प्रतिक्रिया देताना ॲड. विराज गडग, अध्यक्ष - युवा एल्गार आघाडी, संघटक - पालघर विधानसभा (शिवसेना) यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, सदर कामातील आदिवासी मजुरांना त्वरित सुरक्षित निवारा, योग्य प्रकाश व मूलभूत सुविधा देण्यात याव्यात. अन्यथा भविष्यात काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार व जिल्हा परिषद प्रशासनाची राहील.

आदिवासी बहुल जिल्ह्यातील आदिवासी मजुरांनाच अशी असुरक्षित व अमानवी वागणूक मिळणे हे अत्यंत दुर्दैवी असून, हा प्रकार थेट मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसीलदार तसेच जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.